# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६.१०.२०२०**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (१०.१०.२०२० ते १६.१०.२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७.१०.२०२० ते २१.०१०.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ०.० | १८.० | १७.० | ३२.० | १.२ | ८५.१ | - | पाऊस (मिमी) | २ | ० | ६ | २० | ३३ |
| ३२.७ | ३२.७ | २७.१ | २८.४ | ३१.१ | २५.१ | - | कमाल तापमान (अं.से.) | २६ | २७ | २९ | २९ | ३० |
| २३.० | २१.० | १८.४ | २१.० | २२.४ | १९.५ | - | किमान तापमान (अं.से.) | २१ | २२ | २२ | २२ | २३ |
| ४ | ८ | ८ | ७ | ८ | ८ | - | ढग स्थिती (आकाश) | ५ | ६ | ७ | ८ | ८ |
| ८२ | ९३ | ९३ | ९५ | ९६ | ९८ | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९६ | ९१ | ९४ | ९४ | ९३ |
| ६० | ९० | ९१ | ७३ | ६६ | ९८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७७ | ५९ | ६० | ६६ | ७३ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ६ | ६ | ६ | १० |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | द. | नै. | प. | प.वा. | प.वा. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यात तुरळक ठिकाणी दिनांक १७ व १९ ऑक्टोबर रोजी हलक्या तरदिनांक २० व २१ ऑक्टोबर रोजी तीर्लक ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान २६.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २१.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०६ ते १० कि.मी. दरम्यान राहील.<br>**हवामान इशारा:** सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक १९ व २० ऑक्टोबर रोजी रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जना होण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ मागील ३ दिवसांमध्ये जिल्ह्यामध्ये जोरदार पाऊस झालेला असल्याने आणि पुढील ५ दिवसांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्याने भात, मका, सोयाबीन, भुईमुग, ऊस आणि नाचणी पिकांमध्ये पाणी साठल्यास पाण्याचा त्वरित निचरा करावा.<br>➢ द्राक्ष, आंबा व केळी बागांमध्ये पाणी साठल्यास त्वरित निचरा करावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी स्वतःची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी.<br>➢ रबी हंगामामधील पिकांची पेरणी पाऊस थांबल्यानंतर जमिनीस वापसा आल्यानंतरच करावी. |
| संदेश | | ➢ पावसाची शक्यता असल्याने तयार शेतीमालाची (भात, मका, खरीप ज्वारी, भुईमुग व सोयबीन) सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| भात | दाणे भरणे ते पक्वता | ➢ भात पिकामध्ये साठलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>➢ पक्व खरीप पिकांची काढणी पाऊस थांबल्यावरच करावी.<br>➢ काढणी केलेली असल्यास तयार शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| मका | दाणे भरणे ते पक्वता | ➢ मका पिकामध्ये साठलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>➢ काढणी केलेली असल्यास तयार शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| रब्बी ज्वारी | पेरणी | ➢ रब्बी हंगामातील ज्वारीची पेरणी पाऊस थांबल्यावर जमिनीस वापसा आल्यावरच करावी. |
| हरभरा | पेरणी | ➢ रब्बी हंगामातील हरभरा पिकाची पेरणी पाऊस थांबल्यावर जमिनीस वापसा आल्यावरच करावी. |
| भुईमुग | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पिकामध्ये साठलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>➢ पक्व खरीप पिकांची काढणी पाऊस थांबल्यावरच करावी.<br>➢ काढणी केलेली असल्यास तयार शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| सोयाबीन | पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्यामुळे तयार शेतीमाल सुरक्षित ठिकाणी साठवावा. |

# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **ऊस** | पूर्वहंगामी : लागवड | ➢ पूर्व हंगामी ऊस लागवड पाऊस थांबल्यावर आणि जमिनीमध्ये वापसा आल्यावरच करावी. लागवडीसाठी को.८६०३२(नीरा), को.एम.०२६५(फुले २६५), एम.एस.१०००१ (फुले १०००१),को.९४०१२(फुले सावित्री), को.सी.६७१(वसंत-१) या जातींची निवड करावी.<br>➢ ऊस पिकामध्ये साठलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.<br>➢ ऊस पडला / लोळला असेल तर तो एकमेकास बांधून उभा करावा म्हणजे ऊस कांड्यांचा जमिनीशी संपर्क येणार नाही आणि अशा उसाला कांडीवर मुळ्या अथवा पांगशा फुटणार नाहीत. आणि शक्य असल्यास २-३ वेळा हलकी भरणी करून उसाला मातीचा आधार द्यावा. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १६.१०.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**